0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दि.०३/०८/२०११ रोजी प्राप्त झालेली कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल /६-अ/प्र.क्र.५७/२०११/जा.६२७, दिनांक ०४/०८/२०११.
३) सहाय्यक पोलीस निरीक्षक, वडाळा पोलिस स्टेशन, मुंबई यांचे दि.१६/०८/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.
४) टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे मालक रामनाथ भलाई यादव, चालक दिलीपकुमार दशरत यादव, क्लिनर राजू सुखय्या यादव व टँकरचे मेहता राजबहादूर यादव यांचे दि.१६/०८/२०११ चे स्वतंत्र लेखी निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५७/२०११/जा. ६७८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २३ /०८/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

## प्रकरणाची पार्श्वभूमी :-

बंद इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. कंपनीच्या समोरील मोकळी जागा, वडाळा या ठिकाणी अनधिकृतपणे टँकरमधून पेट्रोल/डिझेल काढून विक्री होणार असल्याबाबत खात्रीलायक खबर या कार्यालयास मिळाल्यावरुन या कार्यालयाच्या दक्षता पथकातील अधिकारी तसेच दोन पंच यांच्यासमवेत दि. ३०/०७/२०११ रोजी १२:४५ वाजता उक्त ठिकाणी ठराविक अंतर ठेऊन उभे राहिले. थोडा वेळ टेहळणी करीत असताना प्राप्त खात्रीलायक बातमीनुसार एक पिवळ्या रंगाचा टँकर बंद इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. कंपनीच्या गेटसमोरील जागेत येऊन उभा राहिला. टँकरमधून दोन इसम काळ्या रंगाच कॅन, प्लास्टीकचा पाईप व लोखंडी पक्कड घेऊन उतरले व टँकरचे चारही बाजू पाहून झाल्यानंतर त्यापैकी एक इसम टँकरवर चढून काहीतरी करीत असल्याचे दिसून आले. त्या इसमाने टँकरवरील झाकणे उघडून खाली उभ्या असलेल्या इसमाकडून पाईप घेऊन टँकरचा कप्पा क्रमांक एक मध्ये पाईपाचे एक टोक टाकून दुसरे टोक खाली सोडून खाली असलेल्या इसमाकडून २० लिटरच्या काळ्या कॅनमध्ये पेट्रोल भरत होता. त्यानंतर कप्पा क्र.२ मधून अशाचप्रकारे कॅन पेट्रोलने भरत असल्याचे निदर्शनास आले. त्याचवेळेस इशारा

0002 करुन टँकरकडे धावण्याच्या सुचना दिल्या व टँकरकडे जावून टँकरवरील व खाली उभ्या असलेल्या इसमास ताब्यात घेतले. तद्नंतर घटनास्थळी घडलेल्या घटनेची पंचासमक्ष पाहणी केली असता, २० लिटर क्षमतेने पेट्रोलने पुर्ण भरलेल काळ्या रंगाचा एक कॅन व दुसरा अर्धवट भरलेला कॅन आढळून आला. त्याचप्रमाणे टँकरवरील कप्पा क्रमांक १ चे झाकण उघडे असलेले व कप्पा क्र.२ चे झाकण उघडलेले असून, त्यामध्ये प्लास्टीकच्या पाईपचे एक टोक टाकण्यात येवून दुसरे टोक टँकरच्या खालील बाजूस ठेवलेल्या २० लिटरच्या काळ्या रंगाच्या कॅनमध्ये जोडण्यात आले असल्याचे दिसून आले.

ताब्यात घेतलेल्या दोन्ही इसमास त्याचे नाव विचारले असता, एका इसमाने त्याने त्याचे नांव दिलीपकुमार दशरथ यादव असे सांगून तो टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० वर गेल्या दोन महिन्यापासून काम करीत असून, सदर टँकरचे मालक रामनाथ भलई यादव हे आहेत. मालकाने नेमलेले मेहता राजबहादुर रामदेव यादव हे भारत पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लि. वडाळा टर्मिनल येथून टँकर भरुन देण्याचे व्यवस्थापन करतात. दिनांक ३०/०७/२०११ रोजी मालक व मेहता यांचे सांगण्यावरुन त्यांनी कंपनीमधून पेट्रोल व डिझेल चलन क्रमांक १४०३९६०१९२, दि. ३०/०७/२०११ अन्वये भरुन घेतला.. टँकर भारत पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लि. कंपनीमधून भरुन घेतल्यानंतर ऑटोपेट, भारत पेट्रोलीयम कंपनीचे डिलर, प्लॉट नं. २, टि.पी.एस. ५, एस. व्ही. रोड, मुंबई ५४ येथे खाली करावयाचा होता. परंतू टँकर नियोजित स्थळी न नेता मालक व मेहता यांचे सांगण्यावरुन नेहमीप्रमाणे बंद इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कंपनीच्या गेट समोरील मोकळ्या जागेत (वडाळा) येथे घेवून गेला. तेथे गाडी उभी करुन त्याचे सोबत असलेल्या क्लिनर राजू सुखय्या यादव याचे सोबत गाडीतील २० लिटर क्षमतेच्या काळ्या रंगाचे रिकामे दोन कॅन, एक लोखंडी पक्कड व साधारण ४ मिटर लांबीचा पाईप घेवून खाली उतरुन टँकरच्या चारही दिशेने पाहिल्यानंतर त्यांना कोणी पाहत नाही याची खातरजमा केल्यावर तो टँकरवर पक्कड घेवून चढला व टँकरच्या मागील बाजूस मास्टर वॉलचा लोखंडी रॉड व टँकरच्या वरच्या बाजूस असलेल्या झाकणांना जोडण्यात आलेला रॉड हे दोन्ही ज्या ठिकाणी जोडतात, त्या ठिकाणी कुलुप लावण्यात आलेली कडी पुर्वीच कापून ठेवण्यात आली होती. लोखंडी पक्कडीच्या सहाय्याने कडीची एक बाजू वाकवून त्यामधून कुलूप बाजूला करण्यात आले. नंतर टँकरवरील झाकणांच्या रॉड पुढच्या दिशेस सरकवून टँकरवरील कप्पा क्रमां १ व कप्पा क्रमांक २ वरील झाकणे उघडण्यात आली. खाली उभ्या असलेल्या क्लिनरकडून पाईप घेण्यात येवून पाईपचे एक टोक टँकरच्या कप्पा क्रमांक १ मध्ये टाकून दुसरे टोक खाली उभ्या असलेल्या क्लिनरकडे देण्यात येवून २० लिटर क्षमतेच्या काळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या कॅनमधून स्पीड पेट्रोल पूर्ण भरेपर्यंत काढण्यात आले. त्याचप्रमाणे कप्पा क्रमांक २ मधून साधा पेट्रोल (एम.एस.) काढून घेत असताना अधिकाऱ्यांनी त्या दोघांना पंचासमक्ष ताब्यात घेतले.

RATIONING HEAD MUM

0003

त्याचप्रमाणे त्याने असेही सांगितले की, टँकरचे मालक व मेहता त्यांना महिन्याला पगार देत नसून ते त्याला टँकरमधून दररोज पेट्रोल व डिझेल वर नमूद केल्याप्रमाणे अनधिकृतरित्या काढून घेण्यांचे सांगतात व काढण्यात आलेले पेट्रोल कंपनी परिसरातील दुचाकी वाहनास प्रति २० लिटरचा कॅन रुपये ८००/- या प्रमाणे विकावयास सांगतात. वर त्यातील अर्धी रक्कम ते त्यांचेकडून घेतात. नेहमीप्रमाणे दिनांक ३०/०७/२०११ रोजी कंपनीतून भरुन घेण्यात आलेला टँकर त्यांनी त्यांचे सांगण्यानुसार ऑटोपेट, भारत पेट्रोलीयम कंपनीचे डिलर, प्लॉट नं. २, टि.पी.एस. ५, एस. व्ही. रोड, मुंबई ५४ येथ न नेता प्रथम त्यामधील पेट्रोल काढून घेण्यासाठी घटनास्थळी आणला होता. सदरचे पेट्रोल चोरी करुन कांढतानाच अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष पकडले. त्याबाबत त्याचा जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला.

त्याचप्रमाणे ताब्यात घेतलेल्या दुसऱ्या इसमाकडे त्याचे नाव, गांव विचारले असता त्यांनी त्याचे नाव राजु सुखय्या यादव, टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० वर गेल्या दहा दिवसापासून क्लिनर म्हणून काम करीत असल्याचे सांगून, चालक दिलिपकुमार दशरथ यादव यांनी वरील दिलेल्या जबाबा प्रमाणेच त्याने जबाब दिला व तसा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला.

तद्नंतर अधिकारी यांनी पंचासमक्ष टँकरची तपासणी केली असता, टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० हा भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. येथून चलन क्रमांक १४०३९६०१९२, दिनांक ३०/०७/२०११ अन्वये ३००० लिटर स्पीड पेट्रोल, ४००० लिटर साधा पेट्रोल (एम.एस.) व ४००० लिटर हायस्पीड डिझेल भरुन घेण्यात आला असून सदरचे पेट्रोल, डिझेल ऑटोपेट, भारत पेट्रोलियमचे डिलर प्लॉट नंबर २, टि.पी.एस. ५, एस.व्ही. रोड, मुंबई ४०००५४ येथे वितरण करणेसाठी भरले असल्याचे आढळून आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन सदरचा टँकर वितरणासाठी नियोजित स्थळी न नेता, टँकरच्या मास्टर वॉलचा लोखंडी रॉड व टँकरच्या वरच्या बाजूस असलेल्या झाकणांना जोडण्यात आलेला रॉड हे ज्या ठिकाणी जोडतात त्या ठिकाणी कुलूप लावण्यात आलेली कडी पूर्वीच कापून ठेवण्यात येवून लोखंडी पक्कडीच्या सहाय्याने कुलूप बाजूला करुन टँकरवरील झाकणे उघडून त्यामधून पेट्रोलची अनधिकृतपणे चोरी करुन २० लिटर क्षमतेच्या काळ्या रंगाच्या कॅनमध्ये विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ तसेच (२) दि मोटार स्पिरीट ॲन्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रिब्युशन ॲण्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) आदेश २००५ चे कलम ३, ४, ५ व ६ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द वडाळा पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १७/२०११, दि.३०/०७/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० | १ नग | १०,००,०००/- |
| २ | टँकरच्या कप्पा क्र. १ मधील स्पीड पेट्रोलचा साठा | २९८० लि. | २,०७,२५३/- |
| ३ | टँकरच्या कप्पा क्र. २ मधील साधा पेट्रोलचा साठा (एम.एस.) | ३९९० लि. | २,६७,८८०/- |
| ४ | टँकरच्या कप्पा क्र. ३ मधील हाय स्पीड डिझेलचा साठा | ४०००लि. | १,७७,६०८/- |
| ५ | २० लि. क्षमतेच्या प्लॅस्टिकच्या कॅनमधील २० लिटर स्पीड पेट्रोल | २० लि. | १,३९१/-/- |
| ६ | २० लि. क्षमतेच्या प्लॅस्टिकच्या कॅनमधील १० लि. साधा पेट्रोल | १० लि. | ६७२/- |
| ७ | २० लि. क्षमतेचे रिकामे प्लॅस्टिकचे कॅन | २ नग | १००/- |
| ८ | लोखंडी पक्कड | १ नग | १००/- |
| ९ | साधारण ४ मीटर लांबीचा प्लॅस्टिकचा पाईप | १ नग | २००/- |
| | | एकूण | १६,५५,२०४/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी त्यांचे वाचावे क्र. १ अन्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.१६/०८/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस वडाळा पोलिस स्टेशनचे पोलीस नाईक श्री अे. अे. खोराटे हे उपस्थित राहिले व त्यांनी तपासी पोलीस अधिकारी यांचे वाचावे क्र.३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले.

तसेच सदर सुनावणीस टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे मालक रामनाथ भलाई यादव, चालक दिलीपकुमार दशरत यादव, क्लिनर राजू सुखय्या यादव व टँकरचे मेहता राजबहादूर यादव उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तीवाद :-

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित वडाळा पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक श्री अे. अे. खोराटे यांनी सादर केलेल्या तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदनात, सदर गुन्ह्याचे अनुषंगाने गुन्ह्यात मालक व मेहता यांचा सहभाग आहे किंवा कसे ? याबाबत तपास करणे बाकी आहे. तसेच सदरचा जप्त मुद्देमाल ज्वलनशील

असल्याने व त्यातून थेंब-थेंब पेट्रोलची गळती असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे आहे. तरी मुद्देमालच्या विल्हेवाटीचे लवकरात लवकर आदेश व्हावेत, असे नमुद केले आहे.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे मालक रामनाथ भलाई यादव यांनी युक्तिवाद केला की, जप्त टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७०चा तो स्वतः मालक आहे. आर.बी. ट्रान्सपोर्टच्या नावे तो वाहतुकदाराचे काम करतो. नेहमीप्रमाणे टँकरमध्ये डिझेल भरुन ऑटोपेट पेट्रोल पंप, सांताक्रूझ येथे नेण्याबाबत त्याने दिनांक ३०/०७/२०११ रोजी टँकरचा चालक दिलीप यादव यांना सांगीतले. त्याप्रमाणे चालक भारत पेट्रोलियम कंपनीत डिझेल भरण्याकरीता गेला. परंतु त्यावेळेस तो त्याच्यासोबत नव्हता. घटनेच्या दिवशी तो घरीच होता. टँकर पोलीसांनी जप्त केला आहे, असे त्याला फोन करुन सांगीतले. टँकरच्या चालकाने जे डिझेल चोरीचे काम केले. ते काम करण्यास त्याने सांगीतले नसून, चालक व क्लिनर राजू यादव यांनी त्यांच्या मर्जीने हे काम केले आहे. या गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नाही. तसेच डिझेल काढून ते कोठे विकतात याची त्याला काहीही माहिती नाही. तसेच घटनेच्यावेळी तो तेथे हजर नव्हता. सदरचा टँकर बँकेच्या कर्जाने घेतला असून, त्याची अजुन परतफेड व्हायची आहे. तसेच या टँकरवर त्याचा परिवाराचे जीवनमान अवलबून आहे. तरी जप्त केलेला टँकर त्याला परत मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे चालक दिलीपकुमार दशरत यादव व क्लिनर राजू सुखय्या यादव यांनी युक्तिवाद केला की, ते टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० वर गेल्या ६ ते ७ महिन्यापासून चालक म्हणून तसेच गेल्या १० ते १५ दिवसापासून क्लिनर म्हणून काम करीत आहे. नेहमीप्रमाणे दिनांक ३०.७.२०११ रोजी टँकरमध्ये डिझेल भरण्याकरीता भारत पेट्रोलीयम कंपनी वडाळा येथे गेले. त्यावेळेस त्यांच्यासोबत टँकरचे मेहता राजबहादूर यादव सोबत होते. टँकरमध्ये डिझेल भरुन झाल्यानंतर मेहता यादव निघून गेले. टँकरमध्ये भरलेले डिझेल ऑटोपॅट पेट्रोल पंपावर नेण्याकरीता गाडी तेल कंपनीतून बाहेर [illegible] थोडावेळ आराम करुन नंतर टँकर घेवून जावू असे एकमेकांना सांगीतले व त्यांनी टँकर इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या रिकाम्या जागेत आणून उभा केला. त्याचवेळेस काही अधिकारी तेथे आले व त्यांना पकडून गाडीमध्ये ठेवलेल्या डिझेल व पेट्रोलच्या कॅनबाबत विचारु लागले. त्यावेळेस त्यांनी अधिकाऱ्यांना सांगीतले की, कॅनमधील डिझेल व पेट्रोल या गाडीतून काढले नसून, ते आदल्यादिवशी वाटप केलेल्या गाडीतून उरलेले आहे. परंतु अधिकाऱ्यांनी काहीही न ऐकता टँकर व डिझेल/पेट्रोल जप्त केले व त्यांना पोलीस स्टेशनमध्ये घेवून गेले. अधिकारी यांनी काहीतरी लिहीलेल्या कागदावर त्यांची सही घेतली. त्यात काय लिहीले होते हे त्यांना माहित नाही. तरी जप्त केलेला टँकर मालकास परत मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.१६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे मेहता राजबहादूर यादव याने युक्तिवाद केला की, तो टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० वर मेहता म्हणून काम करीत असून या टँकरचे मालक रामनाथ भलाई यादव हे आहेत. मालकाने सांगीतल्याप्रमाणे तो दिनांक ३०/०७/२०११ रोजी डिझेल भरण्याकरीता टँकरसोबत वडाळा येथील भारत पेट्रोलियम तेल कंपनीत गेला. त्यावेळेस त्याच्या सोबत टँकर मालक नव्हते. टँकरमध्ये डिझेल भरुन झाल्यानंतर हा टँकर ऑटोपॅट पेट्रोल पंप, सांताक्रूझ येथे नेवून खाली करण्याबाबत चालकाला सांगीतले व तो तेथून निघून गेला. त्यानंतर त्याला समजले की, हा टँकर डिझेलची चोरी करीत असतांना पोलीसांनी पकडले आहे. टँकरमधून डिझेल चोरी करण्याबाबत चालकाला त्याने काहीही सांगीतले नव्हते. या गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नाही. तसेच डिझेल काढून ते कोठे विकतात याची त्याला काहीही माहिती नाही. तसेच घटनेच्यावेळी तो तेथे हजर नव्हता. तरी जप्त केलेला टँकर मालकास परत मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

दि. ३०/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खबरीवरुन या कार्यालयाच्या दक्षता पथकातील अधिकारी यांनी पंचासह बंद इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. कंपनीच्या समोरील मोकळी जागा, वडाळा या ठिकाणी आले असता, उक्त ठिकाणी एक पिवळ्या रंगाचा टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० हा बंद इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. कंपनीच्या गेटसमोरील जागेत येऊन उभा राहिला. टँकरमधून दोन इसम काळ्या रंगाच कॅन, प्लास्टीकचा पाईप व लोखंडी पक्कड घेऊन उतरले व टँकरचे चारही बाजू पाहून झाल्यानंतर त्यापैकी एक इसम टँकरवर चढून काहीतरी करीत असल्याचे दिसून आले. त्या इसमाने टँकरवरील झाकणे उघडून खाली उभ्या असलेल्या इसमाकडून पाईप घेऊन टँकरचा कप्पा क्र. १ मध्ये पाईपाचे एक टोक टाकून दुसरे टोक खाली सोडून खाली असलेल्या इसमाकडून २० लिटरच्या काळ्या कॅनमध्ये पेट्रोल भरत होता. त्यानंतर कप्पा क्र.२ मधून अशाचप्रकारे कॅन पेट्रोलने भरत असल्याचे निदर्शनास आले. त्याचवेळेस टँकरकडे जावून टँकरवरील व खाली उभ्या असलेल्या इसमास ताब्यात घेतले. तद्नंतर पंचासमक्ष पाहणी केली असता, २० लिटर क्षमतेने पेट्रोलने पुर्ण भरलेल काळ्या रंगाचा एक कॅन व दुसरा अर्धवट भरलेला कॅन आढळून आला. त्याचप्रमाणे टँकरवरील कप्पा क्रमांक १ व २ चे झाकण उघडलेले असून, त्यामध्ये प्लास्टीकच्या पाईपचे एक टोक टाकण्यात येवून दुसरे टोक टँकरच्या खालील बाजूस ठेवलेल्या २०

लिटरच्या काळ्या रंगाच्या कॅनमध्ये जोडण्यात आले असल्याचे दिसून आले. तेथे उपस्थित दोन्ही इसमांना याबाबत विचारणा करण्यात आली व तसा लेखी जबाब नोंदविण्यात आला. तसेच सदर टँकर तसेच त्यामधील पेट्रोल व डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.

तपासी पोलीस अधिकारी यांनी सादर केलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्याचे अनुषंगाने गुन्ह्यात मालक व मेहता यांचा सहभाग आहे किंवा कसे, याबाबत तपास करणे बाकी आहे. तसेच सदरचा जप्त मुद्देमाल ज्वलनशील असल्याने व त्यातून थेंब-थेंब पेट्रोलची गळती असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे आहे. तरी मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे लवकरात लवकर आदेश व्हावेत, असे नमुद केले आहे. तसेच टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे चालक दिलीपकुमार दशरत यादव व क्लिनर राजू सुखय्या यादव यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेल्या निवेदनात, दिनांक ३०.७.२०११ रोजी नेहमीप्रमाणे ते टँकरमध्ये डिझेल भरण्याकरीता भारत पेट्रोलीयम कंपनी वडाळा येथे गेले. त्यावेळेस त्यांच्यासोबत टँकरचे मेहता राजबहादूर यादव सोबत होते. टँकरमध्ये डिझेल भरुन झाल्यानंतर मेहता यादव निघून गेले. टँकरमध्ये भरलेले डिझेल ऑटोपॅट पेट्रोल पंपावर नेण्याकरीता गाडी तेल कंपनीतून बाहेर काढली. थोडावेळ आराम करुन नंतर टँकर घेवून जावू असे एकमेकांना सांगीतले व त्यांनी टँकर इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या रिकाम्या जागेत आणून उभा केला. त्याचवेळेस काही अधिकारी तेथे आले व कॅनमधील डिझेल व पेट्रोल या गाडीतून काढले नसून, ते आदल्यादिवशी वाटप केलेल्या गाडीतून उरलेले आहे, असे अधिकाऱ्यांना सांगीतले. परंतु अधिकाऱ्यांनी काहीही न ऐकता टँकर व डिझेल/पेट्रोल जप्त केले व काहीतरी लिहीलेल्या कागदावर अधिकाऱ्यांनी त्यांची सही घेतली. तरी जप्त केलेला टँकर मालकास परत मिळावा, असे नमुद केले आहे.

जप्त टँकरचे चालक व क्लिनर यांनी सुनावणीचेवेळी दिलेल्या निवेदनात, त्यांचेवर केलेले आरोपी अमान्य केले असले तरी, आरोपी यांनी घटनास्थळी पेट्रोल व डिझेलने भरलेल्या सदर टँकरच्या कप्पा क्र.१ व २ चे झाकण लोखंडी पक्कडने उघडून त्या कप्प्यातील पेट्रोल पाईपच्या सहाय्याने एका प्लास्टीक कॅनमध्ये काढत असल्याचे तसेच टँकरच्या कप्पा क्र.१ व २ चे झाकण उघडे असून २० लिटर क्षमतेची एक कॅन पेट्रोलने भरलेली व दुसरी कॅन अर्धवट भरलेली असल्याचे आढळून आले आहे. तसेच चालक व क्लिनर यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, दररोज अनधिकृतरित्या टँकरमधून पेट्रोल, डिझेल काढून परिसरातील दुचाकी वाहनात प्रती २० लिटरची कॅन रुपये ८००/- दराने विकण्यास टँकरचे मालक सांगतात. त्याप्रमाणे सदर टँकरच्या मागील व वरच्या बाजूस मास्टर वॉलला असलेला लोखंडी रॉड ज्या ठिकाणी जोडतात तेथील कुलूप लावण्याची कडी पूर्वीच कापून ठेवण्यात आली. त्यानंतर लोखंडी पक्कडच्या सहाय्याने कडीची बाजू वाकवून कूलूप बाजुला केले व त्यामधून पाईपच्या सहाय्याने प्लास्टीक कॅनमध्ये पेट्रोल काढीत असतांना अधिकाऱ्यांनी पकडले असल्याचा जबाब दिला आहे. यावरुन टँकरचे चालक व

क्लिनर यांनी संबंधितांशी संगणमत करुन सदरचा टँकर वितरणासाठी नियोजित स्थळी न नेता घटनास्थळी नेवून टँकरला लावलेले कुलुप लोखंडी पक्कडीच्या सहाय्याने बाजूला करुन टँकरवरील झाकणे उघडून त्यामधील पेट्रोल काढून त्याची गैरमार्गाने विक्री करण्याचा त्यांचा बेकायदेशिर कृत्याबाबतचा उद्देश सिध्द होतो. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून, मा.न्यायालयात याची सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, जप्त करण्यात आलेला टँकरमधील संपूर्ण डिझेल व पेट्रोलचा साठा ज्या कंपनी मधून भरण्यात आला होता त्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., वडाळा टर्मिनस, मुंबई यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच धाडीच्या वेळी घटनास्थळी आढळून आलेल्या २० लिटर क्षमतेच्या दोन प्लॅस्टिक कॅनमधील पेट्रोलचा साठा व त्याकरीता वापरण्यात आलेले लोखंडी पक्कड, रिकामे प्लास्टीक कॅन, प्लास्टीक पाईप इ. वस्तू शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० हा रामनाथ भलाई यादव यांच्या मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या वाहन नोंदणी परवान्यावरुन दिसून येते. तसेच सदर टँकर मालकाने सुनावणी दरम्यान केलेल्या खुलाशात, नेहमीप्रमाणे टँकरमध्ये डिझेल भरुन ऑटोपेट पेट्रोल पंप, सांताक्रूझ येथे नेण्याबाबत टँकरचे चालकास सांगीतले. परंतू तो स्वतः डिझेल भरण्याकरीता तेल कंपनीत गेला नाही. घटनेच्या दिवशी तो घरीच होता त्यावेळी टँकर पोलीसांनी जप्त केला असल्याचे त्याला फोन वरुन समजले. टँकरच्या चालकाने व क्लिनरने त्यांच्या मर्जीने डिझेल चोरीचे काम केले असून, हे काम करण्यास त्याने सांगीतले नाही. तसेच या गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नाही. तसेच डिझेल काढून ते कोठे विकतात याची त्याला काहीही माहिती नसल्याचे नमुद केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्याचे अनुषंगाने गुन्ह्यांत मालक व मेहता यांचा सहभाग आहे किंवा कसे, याबाबत तपास करणे बाकी असल्याचे नमुद केले आहे. टँकर मालकाने दिलेल्या निवेदनावरुन टँकर मालक जरी आरोपी नसले, तसेच त्याचे अपरोक्ष जरी चालकानी त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, सदर जप्त केलेला टँकर बँकेतून कर्जाने घेतलेला असून, या टँकरवरच त्याचा कुटूंबाचे उदरनिर्वाह अवलंबून आहे, ही बाब विचारात घेता, शासनाचे परिपत्रक क्रमांक जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ ना.पु.२३, दि. ३० ऑगष्ट, २००५ मधील निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० हा त्याच्या एकुण किंमतीच्या ५० टक्के एवढया रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर त्याच्या मालकांस परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

0009 प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वडाळा पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्था.गुन्हा नोंद क्रमांक १७/२०११, दि.३०/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० हा त्याच्या एकूण किमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर त्याच्या मालकास परत करण्यात यावा.

२) सदरची बँक गॅरंटी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी टँकर मालकाची राहील.

३) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू टँकर वाहन विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

४) तथापी, या वाहनांच्या मालकांनी अशी बँक हमी सादर न केल्यास, सदर वाहनांची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी

५) जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील संपुर्ण स्पीड पेट्रोलचा २९८० लि., साधा पेट्रोलचा (एमएम) ३९९० लि. व हायस्पीड डिझेलचा ४००० लि. साठा, ज्या कंपनीमधून भरलेला आहे त्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., वडाळा टर्मीनस, मुंबई यांच्याकडे पोलीसांनी परत करावा.

६) घटनास्थळी आढळून आलेल्या प्लॅस्टिकच्या कॅनमधील स्पीड पेट्रोलचा २० लिटर व साध्या पेट्रोलचा १० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा. सदर पेट्रोल साठ्याची पोलीसांनी किरकोळीने प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

७) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले २० लि. क्षमतेचे प्लॅस्टिकचे दोन रिकामे कॅन, एक लोखंडी पक्कड व ४ मीटर लांबीचा प्लॅस्टिकचा पाईप या वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे चालक, दिलीपकुमार दशरथ यादव
२) टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे मालक, रामनाथ भलई यादव
३) टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे मेहता, राजबहादुर रामदेव यादव
४) टँकर क्र. एमएच-४३-ई-२६७० चे क्लिनर, राजू सुखय्या यादव

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वडाळा पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) मे. भारत पेट्रोलियम कॉपोरेशन लि., वडाळा टर्मीनल, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.